# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**३२ वा मजला, सेंटर वन बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफपरेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७ फॅक्स :(०२२)२२१५१८६७ ई मेल: info.mahasecurity@maharashtra.gov.in**


**दिनांक** : 08.09.2022.

## - प्रशिक्षणासाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेवारांसाठी सुचना -

महामंडळामार्फत राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रितील दि.08.09.2022 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम यादीतील 7000 उमेदवारांपैकी अ.क्र. 1 ते अ.क्र.4500 पर्यंतच्या अंतिम यादीतील उमेदवारांना प्रथम टप्प्यात विविध प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे प्रस्तावित आहे. तेव्हा त्यांना **विविध प्रशिक्षण केंद्रावरती नेमुन दिलेल्या प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षणासाठी हजर राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येतील.**

1) प्रशिक्षण केंद्रावर हजर होत असतांना उमेदवारांनी खालील नमुद बाबींची पुर्तता करणे व त्याप्रमाणे प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घेण्यात यावी.

   1.1 **वैद्यकिय प्रमाणपत्र** :- उमेदवारांनी शारिरीक दृष्टया प्रशिक्षणासाठी सक्षम असल्याबाबत शल्य चिकित्सक (Civil Surgeon) अथवा जिल्हा शासकीय रुग्णालय अथवा सिव्हिल हॉस्पिटल यांचेकडील वैद्यकिय प्रमाणपत्र. उमेदवारांची वैद्यकिय तपासणी करण्याबाबत जिल्हा वैद्यकिय अधिकारी यांना अग्रेषित केलेल पत्र सोबत जोडण्यात आले आहे. **(सहपत्र -1)**

   1.2 प्रशिक्षणासाठी हजर होणाऱ्या पुरुष उमेदवार यांनी **कोविड-19 चे दोन** डोस घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. ज्या उमेदवारांनी दोन डोस घेतले नसतील त्यांनी प्रशिक्षणासाठी हजर राहण्याच्या दिनांकापुर्वी **48 तास अगोदर कोविड-19 ची RT-PCR** चाचणी निगेटीव्ह असल्याचे प्रमाणपत्र हजर होताना आवश्यक आहे.

   1.3 प्रशिक्षणासाठी हजर होणाऱ्या उमेदवारांनी संबंधीत संबंधीत जिल्हा पोलीस अधिक्षक अथवा आयुक्त **यांच्याकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र मिळण्यास काही कारणास्तव विलंब होत असल्यास चारित्र्य पडताळणीसाठी अर्ज केल्याची पावती प्रशिक्षण केंद्रावर सादर करणे आवश्यक आहे. (सहपत्र -2)**

2) उमेदवारांना प्रशिक्षणासाठी हजर होताना सिक्युरिटी डिपॉझिट रु.10000/- (त्यातील रु.5000/- Refundable आणि रु.5000/- Non-refundable असेल) भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम प्रशिक्षण केंद्रावर हजर होताना रोखीने अथवा Online द्वारे अदा करावयाची आहे, याची नोंद घ्यावी.

3) प्रशिक्षण केंद्रामध्ये हजर झाल्यानंतर उमेदवारांना प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत खालील पी.टी.साहित्य स्वत: खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी महामंडळाने निश्चित केलेला पीटी किट्स भत्ता रु.1450/- त्यांना प्रत्यक्षात महामंडळाकडून नेमणुक दिल्यानंतर त्यांच्या वेतन खात्यात अदा करण्यात येईल.

   1. खाकी हाफ पॅन्ट (दोन नग)
   2. पांढरा रंगाचा पी.टी टी शर्ट (दोन नग)
   3. ब्लॅक सॉक्स (दोन जोड)
   4. ब्लॅक रंगाचा पी.टी शूज (एक जोड)
   5. ब्लॅक नॉयलॉन बेल्ट (एक नग)

..2/-

4) प्रशिक्षणासाठी हजर होताना खालील प्रमाणे मुळ कागदपत्रे आणि इतर साहित्य यासह उमेदवारांनी हजर व्हावे.

1) वर परि.क्र.1 मध्ये नमुद केलेली प्रमाणपत्र व त्यांच्या सत्य प्रती

2) PAN CARD

3) ADHAR CARD प्रत्येकी 2 झेरॉक्स प्रतीसह

4) स्वत:चे पासपोर्ट साईजचे 2 फोटो

5) साहित्य :- i) दैनंदिन वापराचे कपडे ii) स्व:खर्चासाठी पैसे iii) बेडरोल iv) जेवणासाठी आवश्यक ताट, वाटी, ग्लास इ. v) अंघोळ व बाथरुमसाठी बादली, मग व इतर साहित्य *iv) खाकी रंगाची कॅप* व इतर दैनंदिन वापराचे व स्वच्छतेचे साहित्य.

**संचालक (प्रशासन)**
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई